

V2wM66
K5

V2wM66
K5
115617

# गोखल्यांच्या गोष्टी

: लेखक :

पु. पां. गोखले

# गोखल्यांच्या गोष्टी

लेखक : ए. पां. गोखले

मूल्य साठ पैसे

इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणें

प्रकाशक
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य
१२५७ सदाशिव पेठ,
पुणें २.

●

प्रथमावृत्ती : डिसेंबर १९६५.

●

मुद्रक
गंगाधर शंकर दाते
कलागृह छापखाना
६६६ सदाशिव पेठ,
पुणें २.



गोपाळकृष्ण गोखले



इंग्लंडमध्ये गोखले
सन १९१२ ते १९१४

# इकडे जरा द्या कान.

" काय तुझ्या मनात ? सांग माझ्या कानात. " असे आई मुलाला म्हणते; मूल आईला म्हणते तोच जिव्हाळा गोष्टींविषयी मुलांना असतो. कारण हसत खेळत गोष्टी मुलाना आपल्या 'मनातले' सांगत असतात. मागे काय होते, आता काय आहे, पुढे काय व्हावे ही जाणीव गोष्टी करून देतात. अशी वाढती जाणीव हेच खरे शिक्षण. त्या शिक्षणानेच माणुसकी अंगात मुरते. थोरामोठ्यांच्या बारीक सारीक गोष्टीतही त्यांचे मोठेपण आढळते. भारताच्या थोरामोठ्या पुरुषांत नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांची गणना आहे. ते आधुनिक भारताचे मर्यादा-पुरुषोत्तम मानले जातात. म्हणून त्यांच्या गोष्टी येथे सादर केल्या आहेत. त्या वाचून " आपण त्यांच्यासमान व्हावे। हाच सापडे बोध खरा ॥ " असे बालगोपाळांना वाटेल. तसे वाटावे आणि अनेक मर्यादा-पुरुषोत्तम नव्या पिढीत निपजावेत यातच नामदारांची खरी पूजा आहे व भारताचे तेज आहे.

मर्यादा-पुरुषोत्तम होणे म्हणजे शीलसंपन्न होणे. शौर्य, शहाणपण, शुद्धता, विवेक, स्वावलंबन, वरच्या खालच्या भोवतालच्या मंडळीबद्दल आपुलकी आणि विनय म्हणजे शील. वाचक-मनात त्याची जोपासना व्हावी म्हणून इंद्रायणी साहित्य प्रकाशनाचे श्री. शामराव दयार्णव कोपर्डेकर यांचे प्रारंभापासून कथा, पुस्तके प्रसिद्ध करण्यातील ध्येय प्रकट होते. त्यांची ही व्यवसायात्मक बुद्धि देशसेवेचीच आहे. ती अखंड यशस्वी होवो.

कराड पु. पां. गोखले